## ❖ गायतोंडेंच्या चित्राला १९ कोटी ९९ लाख :-

- जगप्रसिद्ध चित्रकार वासुदेव गायतोंडे यांचे १९६३ मधील एक चित्र येथील 'सॅफरनआर्ट' संस्थेने केलेल्या लिलावात तब्बल १९ कोटी ९९ लाख रुपयांना विकले गेले. जागतिक लिलावात विकल्या गेलेल्या गायतोंडे यांच्या पाच अतिमहागड्या चित्रांपैकी हे एक चित्र मानले जात आहे. त्याशिवाय, 'सॅफरनआर्ट'ने आतापर्यंत विकलेले हे सर्वात महागडे चित्रही ठरले आहे.

## ❖ उबर'चे लंडनमधील लायसन्स रद्द:-

- अमेरिकास्थित टॅक्सी सेवा पुरवणारी कंपनी उबर हिच्या लंडनमधील लायसन्सचे नूतनीकरण न करण्याचा निर्णय त्या शहराच्या वाहतूक विभागाने घेतला आहेगंभीर . फौजदारी गुन्ह्यांची माहिती देण्याबाबत कुचराई केल्याचा ठपका ठेवताना, लंडनमधील रस्त्यांवर टॅक्सी सेवा चालवण्यासाठी उबर 'सक्षम आणि योग्य' नसल्याचे 'ट्रान्स्पोर्ट ऑफ लंडन'ने म्हटले आहेसप्टेंबरला ३० उबरच्या लंडनमधील लायसन्सची मुदत . .संपुष्टात येणार आहे'नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या अनेक मुद्द्यांवर उबरने आपली कॉर्पोरेट जबाबदारीने पाळलेली नाही,' असे लंडनच्या वाहतूक विभागाने म्हटले आहे.
मात्र या निर्णयानंतर कल्पक कंपन्यांसाठी लंडनचे वातावरण प्रतिकूल असल्याची टीका करत या निर्णयास न्यायालयात आव्हान देण्याचे उबरने ठरवले आहेलाख ३५ . लंडनवासी उबर ॲप वापरत असून हजारांहून अधिक लायसन्सधारक चालकांची रोजीरोटी कंपनीवर अवलंबून आहे, या सर्वांना यामुळे धक्का बसणार आहे, अशी प्रतिक्रिया कंपनीने दिली आहेनुसार१९९८ इंग्लंडमधील खासगी भाडे वाहन कायदा ., वाहतूक विभागाच्या या निर्णयाविरोधात याचिका करण्यासाठी उबेरकडे २१ दिवस असून ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना सेवा सुरू ठेवता येईल.
उबेरकडून अयोग्य स्पर्धा केली जात असल्याच्या तसेच उबरच्या चालकांशी संबंधित हिंसाचाराच्या घटनांप्रकरणी कारवाई न केल्याच्या मुद्द्यावरून गेल्या काही महिन्यांमध्ये उबरवर सातत्याने टीका होत आहेडेन्मार्क आणि हंगेरीमधील सेवा बंद . करणे उबरला भाग पडले असून अमेरिकेतील काही राज्यांमध्ये नियामक खटले सुरू आहेत.